Complykaro



# नोकरी करणाऱ्या ३ टक्के महिला असुरक्षितच !

## 'कॉम्पलायकरो'च्या सर्वेक्षणातील धक्कादायक वास्तव

**मुंबई (प्रतिनिधी) :** महिला अत्याचारविरोधी अनेक कायदे झाले तरी महिलांमधील असुरक्षेची भावना कायम आहे. येत्या ८ मार्च रोजी जागतिक महिला दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा होणार असला तरी पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून नोकरी करणाऱ्या तीन टक्के महिलांना आजही असुक्षित वाटते. 'कॉम्पलायकरो' या कंपनीने केलेल्या एका सर्वेक्षणात ही बाब समोर आली आहे.

जागतिक महिला दिनाच्या पाश्वभूमीवर करण्यात आलेल्या सर्वेक्षणात महिला सुरक्षेच्या संदर्भात कॉम्प्लायकरो या कंपनीने नरिमन पॉईंट, लोअर परळ आदी भागात नोकरी करणाऱ्या महिलांचे सर्वेक्षण केले. त्यात तीन टक्के महिलांना आजही असुरक्षित वाटत असल्याचे समोर आले आहे.

नोकरी करणाऱ्या महिलांना 'लैगिंक छळ कायदा २०१३'काय आहे, तो कधी अंमलात आला आदी प्रश्न विचारण्यात आले. त्याविषयी महिलांत जाणीवजागृती खूपच कमी असल्याचे दिसून आल्याचे कॉम्प्लायकरो प्रायव्हेट लिमिटेडचे संस्थापक विशाल केडिया यांनी सागितले.